जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०८/२०२३
## दि.०१/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १८५/२०२३,भादविक ३२४,५०४,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | चेतन लोंढे,वय ३१ वर्षे,रा.५७०,आंबेडकरनगर,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपीत** | सुरज ऊर्फ डमऱ्या गायकवाड,वय २२ वर्षे,रा.तळजाई वसाहत,पदमावती,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०७/२०२३ रोजी रात्रौ २३.३० वा.आंबे चौक,तळजाई वसाहत,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने नमुद ठिकाणी विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्याचेकडील बांबुने मारहाण करुन,त्याचे हातातील बांबु जमलेल्या लोकांचे दिशेने उगारून "आमचे भांडणा मध्ये कोणी पडला तर,त्यालाही संपवुन टाकीन,मी तळजाईचा भाई आहे,माझ्या कोणी नादाला लागायच नाही" असे म्हणुन सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रेशीम कोळेकर ९५०३३७८०५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४०४/२०२३,भादविक २७९,३३८,३३७ ,४२७ मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | बाळु फुंदे,वय ४८ वर्षे,रा.वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | पीएमपीएमएल बस वरील चालक (जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/०८/२०२३ रोजी सकाळी ०८/४० वा.बीआरटी रोड मध्ये आपले घर बस स्टॉप जवळ पुणे-नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल विभागात चालक म्हणुन आहेत. फिर्यादी हे त्यांचेकडील बस ही आपले घर या बस स्टॉपवरून पॅसेजंर घेवुन पुणे मनपाकडे बीआरटी रोडने जात असताना,यातील नमुद पीएमपीएमएल इलेक्टिक बस वरील चालकाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात पुणे मनपा ते वाघोलीचे दिशेने चालवुन, नमुद ठिकाणी त्याचे समोरील कारला ओव्हरटेक करीत असताना, फिर्यादी यांचे लेन मधे येवुन फिर्यादी यांचे बसला पुढील बाजुस जोरात धडक देवुन,सदर दोन्ही बसचे पुढील बाजुस जोरात धडक देवुन,फिर्यादी व दोन्ही वाहनातील वाहक तसेच दोन्ही बस मधील अंदाजे २० प्रवाशी त्याचप्रमाणे आरोपीत व त्याचे बस मधील वाहक यांना दुखापत केली. तसेच फिर्यादी यांचे बस मधील प्रवासी राहुल रविंद्र सिंग,वय २१ वर्षे,रा.शिक्रापुर,पाबळ चौक,ता.हवेली,जि. पुणे यांचे डावे हाताचे अंगठया शेजारील बोटाला गंभीर दुखापत करुन,फ्रॅक्चर करण्यास कारणीभुत होवुन,अपघातात फिर्यादी व स्वतः चालवित असलेल्या वाहनास नुकसान करण्यास कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, व्ही.बी.भोसले ९९७५२०८७६८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५३७/२०२३,भादविक ३०९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३२ वर्षे,रा.येरवडा पुणे |
| **आरोपीत** | येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे येथील शिक्षा बंदी क्र.सी ९६८ (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०२३ रोजी सकाळी ०८/३० ते ०८/४५ वा.चे दरम्यान येरवडा खुले कारागृह मुद्रणालय येथील आतील परिसरातील मागील बाजुस पाण्याच्या हौदा जवळ |
| **तपशिल** | यातील नमुद येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे येथील शिक्षा बंदी क्र.सी.९६८ याने येरवडा खुले कारागृह मुद्रणालय येथील आतील परिसरातील मागील बाजुस पाण्याच्या हौदा जवळ त्याची मानसिक स्थिती ठिक नसल्याने,तेथील पडलेल्या खराब ब्लेडने स्वतःच्या डाव्या हातावर स्वतःने मारुन घेवुन,स्वतःला गंभीर जखम करुन,आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लिंगे ९५११३३१५७३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११३५/२०२३,भादविक ३२४,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | गणेश जावळे,वय ३० वर्षे,रा.वैदुवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/०७/२०२३ दुपारी १४/३० वा.सर्व्हे नं.३१२,गल्ली नं.०१,इंदीरानगर मित्र मंडळ, वैदुवाडी,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घराचे बाहेर जात असताना,यातील नमुद इसमांनी आपसांत संगनमत करुन,फिर्यादी यांचे जवळ येवून,त्यांचे मध्ये दिनांक ३०/०७/२०२३ रोजी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून,शिवीगाळ करुन,तुला फार मस्ती आलेली आहे,तुला आता बघतोच असे म्हणुन फिर्यादी यांचे डाव्या डोळयावर हातातील कडयाने मारून,त्यांना दुखापत केली आहे. तसेच त्यांचेकडील कोणत्यातरी धारदार हत्याराने,फिर्यादी यांचे छातीवर डाव्या बाजूस मारून जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, जी.बी.क्षिरसागर ८३८००९७८६६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**